# प्रस्तावना

संतसाहित्य हा माझा आधीपासूनच जिहाळ्याचा विषय आहे. लहानपणीच या वाङ्मयाचे बाळकडू मला माझ्या आईकडून मिळाले होते. लहानपणीच मी माझ्या आईवडिलांसोबत तीर्थक्षेत्रांना जात असायचे. नासिक हे तर सर्वतीर्थांचे तीर्थक्षेत्र. सारे बालपण या तीर्थक्षेत्राच्या गावी गेल्यामुळे तेथील तीर्थस्थानांचे माझ्या मनात एक गूढ आकर्षण कायमचे कोरले गेले होते. पण बालवयातील या गूढ आकर्षणाचे गूढ उकलण्याची वेळ ही लग्नानंतरच आली. घरात संतसाहित्यावरील अनेक धार्मिक पुस्तके, अनेक जुन्या पोथ्या हस्तलिखिते होती. या ना त्या निमित्ताने व बऱ्याचदा कुतूहलाने संतांनी वर्णन केलेल्या स्थानांचा महिमा मला वाचावयास मिळाला. पण त्यातही विशेष लक्ष वेधले गेले ते महानुभावांच्या स्थानमाहात्म्य वर्णनावरील साहित्याकडे. पुढे असे लक्षात आले की महानुभाव संप्रदायात ईश्वर अवतारानंतर तीर्थक्षेत्रांनाच अधिक महत्त्व आहे; नव्हे महानुभाव तीर्थक्षेत्र ईश्वरतुल्य मानतात. महाराष्ट्रातील विविध धार्मिक संप्रदायांनी तीर्थक्षेत्रांबद्दल व पवित्र स्थानांबद्दल जे सांप्रदायिक माहात्म्य वर्णन केले असेल त्याच्यापेक्षा कितीतरी पटींनी महानुभावांनी तीर्थक्षेत्रांचे माहात्म्य वर्णन केले आहे. किंबहुना मला अशा प्रकारची वर्णने अधिक लक्षवेधक वाटली. आणि या अनुषंगाने कुतुहलापोटी मी ही प्रकाशित अप्रकाशित स्थानमाहात्म्ये वाचू लागले. प्रसंगानुरूप या स्थानांना मी भेटीही देऊ लागले. महानुभाव संप्रदायात तीर्थक्षेत्राला 'स्थान' या विशेष शब्दाने संबोधले जाते. किंबहुना इतर संप्रदायाप्रमाणे महानुभावांची ही तीर्थक्षेत्रे व स्थाने कल्पित वा मनुष्यनिर्मित नसून त्या स्थानाला निश्चित असा एक वस्तुस्थितीचा इतिहास आहे. त्यामुळे

महानुभावांच्या या तीर्थस्थानांचे मला विशेष अप्रूप वाटले.

एम.ए.ला असताना जे महानुभाव साहित्य वाचले होते. त्यातूनही महानुभाव साहित्याची गोडी माझ्यात निर्माण झाली होती. एम.ए.ला शिकत असताना डॉ. भाऊसाहेब खांदवे यांच्याशी महानुभावाच्या स्थानमाहात्म्यासंबंधी वारंवार चर्चा केली. डॉ. खांदवे हे जुन्या नव्या साहित्याचे मान्यवर अभ्यासक असून महानुभावांच्या तीर्थक्षेत्रांच्या परिसरात त्यांचे वास्तव्य आहे. त्यांच्याशी झालेल्या चर्चेतूनच महानुभावांच्या स्थानमाहात्म्यवर्णनपर साहित्याचा अभ्यास असा विषय निश्चित केला.

प्रस्तुत प्रबंधाचे शीर्षक ठरल्यावर एकूण सात प्रकरणांत या प्रबंधाची मांडणी केली. महानुभावांची संबंधी विषयावरची पुस्तके शोधून काढणे, त्यातील स्थानमाहात्म्याचा अभ्यास करणे हे तसे दुष्कर कार्य होते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सुमारे ५०० ते ७०० वर्षांपूर्वीची भाषा अभ्यासणे, अनेक पोथ्यांचे वाचन करणे, त्यांतील महत्त्वाचे मुद्दे शोधून काढणे हे तसे जिकीरीचे काम होते. महानुभावांची साहित्यसंपदा आणि समकालीन संतांची साहित्यसंपदा यात आशय विषय व अभिव्यक्तीच्या दृष्टीने खूपच फरक दिसून येत होता. इतर संप्रदायांचे जनवाणीतील साहित्य, त्यांची भोळी भाबडी भावाभिव्यक्ती आणि महानुभावांचे संस्कृतप्रचूर लेखन यात फार मोठी तफावत मला जाणवत गेली आणि म्हणून महानुभावांच्या साहित्याचा अभ्यास करणे तितकेसे सोपे नाही हे लक्षात आले. मात्र चिकाटीशिवाय पर्याय नाही हे लक्षात आल्याने नेटाने अभ्यास करणे अपरिहार्य होते आणि गेल्या तीन वर्षांच्या माझ्या चिकाटीची फलश्रृती म्हणजे प्रस्तुत प्रबंधलेखन होय असे मला वाटते.

प्रस्तुत प्रबंध लेखन पूर्णत्वास नेण्यासाठी मला अनेकांचे सहकार्य लाभले. त्यात विशेषत: माझे दीर व संतसाहित्याचे जाणते अभ्यासक डॉ. अविनाश आवलगावकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अमरिकेला शिकण्यासाठी गेलेला असला तरी तेथूनही माझ्या अभ्यासाची सातत्याने चौकशी करणारा माझा मुलगा चि. अक्षर याचे मोलाचे नैतिक भावबळ प्रबंध लेखनामागे आहे. माझी मुलगी अनन्या व धाकटा अन्वय यांच्यात व माझ्यात अभ्यास करण्याची स्पर्धा लागलेली असायची. अनन्या सी.ए. होण्यापूर्वीच मला प्रबंध लेखन पूर्ण करायचे होते. त्यात मात्र तिने बाजी मारली. माझ्या तीनही मुलांच्या विद्यार्थीवृत्तीचा अभ्यास करण्यासाठी मला मोलाचा प्रेरणा स्रोत मिळाला,

म्हणून प्रबंध लेखनाच्या पूर्णत्वाची जबाबदारी पार पाडता आली.

प्रबंधलेखन करीत असताना अनेकांचे सहकार्य मला वेळोवेळी लाभले. त्यात अमरावतीचे ज्ञानपीठाचे अधिष्ठाता प.पू. आचार्य श्री गोविंदराजव्यास कारंजेकर यांच्या मार्गदर्शनाचा विशेष लाभ झाला. त्यांच्या ऋणातून मला मुक्त होणे कधीच शक्य नाही म्हणून हा प्रबंध मी त्यांना अर्पण केलेला आहे.

पारनेरच्या कला, कॉमर्स महाविद्यालयातील मराठीचे प्रमुख गुरूवर्य प्रा. डॉ. भाऊसाहेब खांदवे यांचे मोलाचे मार्गदर्शन मला विसरणे शक्य नाही. त्यांनी मला अत्यंत शिस्तबद्ध मार्गदर्शन केले. एम ए.च्या वर्गात असतानापासूनचे त्यांनी जोडलेले माझ्याशी लेकीचे नाते अजूनही पाळले आहे. मात्र प्रबंधलेखनाच्या शिस्तीत हे नाते कधीही आड येऊ दिले नाही. मार्गदर्शन करताना एका मार्गदर्शकला असावी लागणारी कठोर शिस्तही त्यांच्याठिकाणी मी अनुभवली आहे. अवघ्या तीन वर्षांत प्रबंध लेखनाचे काम करून घेण्याचे श्रेय मी निश्चित सरांना देते.

पीएच.डी. चे शोधलेखन पूर्ण करीत असताना अनेक सुहृद आस्थेने चौकशी करीत असत, त्यांचेही स्मरण यावेळी मला होते. त्या सर्वांच्या आभारांसह मी प्रास्ताविक पूर्ण करते.

❖ ❖ ❖